


# विशेष मिशन इंद्रधनुष मोहिम २.० (IMI 2.0)

* ***विशेष मिशन इंद्रधनुष मोहिम २.० (IMI 2.0)***

## आरोग्य विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद

# प्रस्तावना

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्रात २५ जिल्हयात विशेष मिशन इंद्रधनुष मोहिम २.० (IMI 2.0) राबविण्यात येत असून त्यानूसार उस्मानाबाद जिल्हयात डिसेंबर २०१९ ते मार्च २०२० या कालावधीत दरमहा खालील कृति नियोजना प्रमाणे ग्रामीण व शहरी भागात मोहिमेची सुरुवात करण्यात आलेली आहे. सदर मोहिमे अंतर्गत लसीकरणा पासून वंचित राहीलेल्या किंवा अर्धवट लसीकरण झालेल्या ०-२ वर्ष वयोगटातील बालकांना व गरोदर मातांना लसीकरण करण्यात येत आहे.

# विशेष मिशन इंद्रधनुष मोहिम २.० (IMI 2.0)

## मोहिम कालावधी

१) पहिला टप्पा :- २ डिसेंबर २०१९ (पूर्ण)

२) **दुसरा टप्पा :- ६ जानेवारी २०२० (प्रस्तावीत)**

३) तिसरा टप्पा :- ३ फेब्रूवारी २०२०

४) चौथा टप्पा :- २ मार्च २०२०

- कामाच्या सात (७) दिवशी (स्थानिक सुटटी, रविवार, व नियमित लसीकरण सत्र सोडून)

# विशेष मिशन इंद्रधनुष मोहिम २.० (IMI 2.0)

## प्रथम फेरी जिल्हा समन्वय समिती सभा :-

लोकमत




जिल्हा कचेरीत मंगळवारी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बालके व मातांसाठी राबविण्यात येणार असलेल्या विशेष इंद्रधनुष मोहिमेसंदर्भात प्रशासनाच्या विविध विभागांची बैठक झाली.


Hello Osmanabad
Page No. 2 Nov 20, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

# जिल्ह्यात चार टप्प्यांत राबविली जाणार विशेष इंद्रधनुष मोहीम

## बैठकीत सूचना : शहरी व ग्रामीण भागात २ डिसेंबरपासून होणार प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**उस्मानाबाद :** जिल्हाभरातील शहरी व ग्रामीण भागातील जोखीमग्रस्त भागात चार टप्प्यांत विशेष मिशन इंद्रधनुष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेतील पहिला टप्पा हा २ डिसेंबर रोजी पार पडणार आहे. ० ते २ वर्षे वयोगटातील बालकांच्या माता व गरोदर मातांनी लसीकरणाद्वारे या मोहिमेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी दीपा-मुधोळ मुंडे यांनी केले.

विशेष इंद्रधनुष मोहीम २.० जिल्हा समन्वय समितीच्या बैठकीचे आयोजन मंगळवारी जिल्हाधिकारी दीपा-मुधोळ मुंडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. जिल्ह्यात ही मोहीम चार टप्प्यांत राबविली जाणार आहे. पहिला टप्पा २ डिसेंबर, दुसरा ६ जानेवारी २०२०, तिसरा ३ फेब्रुवारी तर चौथा २ मार्च रोजी पार पडेल. ही मोहीम जिल्हाभरातील जोखीमग्रस्त शहरी व ग्रामीण क्षेत्रामध्ये राबविली जाणार आहे.

मंगळवारच्या बैठकीत प्रास्ताविकात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वडगावे यांनी या मोहिमेविषयी सविस्तर माहिती दिली. या मोहिमेत एकात्मिक बालविकास विभाग, ग्रामविकास विभाग, नगरविकास विभाग, नगरपालिका, शिक्षण विभाग, समाजकल्याण विभाग, जिल्हा माहिती अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, रेल्वे स्टेशन, विद्युत विभाग यांचा सक्रिय सहभाग असणार असल्याचे डॉ. वडगावे यांनी याप्रसंगी सांगितले.

ग्रामीण व शहरी भागातील ज्या अतिजोखीमग्रस्त भागात लसीकरणाचे काम कमी प्रमाणात झाले आहे, अशा भागांचा समावेश सदर मोहिमेत करण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान, एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांना याप्रसंगी करण्यात आल्या. या बैठकीस जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोलते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आर. व्ही. गलांडे, डॉ. जे. एन. सय्यद, डॉ. सचिन बोडके, डॉ. निपाणीकर, डॉ. श्रीनिवास हंबीरे, डॉ. मिलिंद पौळ, डॉ. एम. आर. पांचाळ, डॉ. खडके, डॉ. होळे, एस. एस. भोसले, संतोष जमदाडे, पी. एस. पवार, डॉ. किरण गरड, डॉ. सुशील चव्हाण, डी. डी. कवितके, ए. यू. लाकाळ आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

Hello Osmanabad
Page No. 2 Nov 20, 2019
Powered by: erelego.com

# ***विशेष मिशन इंद्रधनुष मोहिम २.० (IMI 2.0)*** *

## प्रथम फेरी शुभारंभ :-

लोकमत

# विशेष मिशन इंद्रधनुष लसीकरण मोहिमेस प्रारंभ

## १७० लसीकरण सत्रांचे आयोजन : जिल्ह्यात १०३५ बालके, १८७ गरोदर माता लाभार्थी

लोकमत न्यूज नेटवर्क

**उस्मानाबाद :** जिल्ह्यात विशेष मिशन इंद्रधनुष लसीकरण मोहीम ही चार टप्प्यात राबविण्यात येत आहे. या मोहिमेची सुरुवात सोमवारी करण्यात आली. याचा शुभारंभ जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, जिल्हा शल्यचिकित्सक राज गलांडे, डॉ. डी. के. पाटील यांच्या हस्ते पारधी पेढी पापनास नगर येथे झाला.

सदर मोहीम जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील जोखिमग्रस्त क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असून, लसीकरणापासून वंचित राहिलेल्या किंवा अर्धवट लसीकरण झालेल्या ० ते २ वर्षे वयोगटातील बालकांना व गरोदर मातांना संपूर्ण लसीकरणाचा लाभ देण्यात येणार आहे. या महिन्यातील ही मोहीम २ डिसेंबरपासून पुढे सात दिवस चालू राहणार आहे. जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात १०३५ बालके व १८७ गरोदर माता लाभ घेणार आहेत. त्यासाठी १७० लसीकरणांचे सत्र आहेत.

मोहिमेदरम्यान लसीकरणापासून वंचित असलेल्या जास्तीत जास्त गरोदर माता व बालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राज गलांडे यांनी केले आहे. कार्यक्रमास डॉ. एस. यू. खान, अर्जुन लाकाळ, सी. एन. थोरात, एम. एस. सुरवसे, ए. यू. मगर, सी. एन. काकडे आदींची उपस्थिती होती.



उस्मानाबाद येथे लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राज गलांडे, डॉ. डी. के. पाटील, डॉ. एस. यू. खान, अर्जुन लाकाळ, सी. एन. थोरात, एम. एस. सुरवसे आदी.

Hello Osmanabad
Page No. 2 Dec 03, 2019
Powered by: erelego.com

# ”विशेष मिशन इंद्रधनुष्य मोहिम पहिली फेरी दि.२ ते १० डिसेंबर २०१९ : तालुका निहाय अहवाल

| अ. क्रं. | तालुके | आरोग्य सेवा सत्रे | | अपेक्षित गरोदर मातांची संख्या | अपेक्षित ०-२ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांची संख्या | एकूण लसीकरण | | एकूण टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नियोजीत | प्रत्यक्ष | | | गरोदर माता | ०.२ बालके | गरोदर माता | ०.२ बालके |
| १ | भुम | 38 | 39 | 31 | 162 | 38 | 132 | 123 | 81 |
| २ | कळंब | 18 | 22 | 19 | 116 | 17 | 115 | 89 | 99 |
| ३ | लोहारा | 17 | 16 | 14 | 54 | 11 | 51 | 79 | 94 |
| ४ | उमरगा | 22 | 26 | 64 | 310 | 61 | 319 | 95 | 103 |
| ५ | उस्मानाबाद | 25 | 41 | 20 | 164 | 26 | 170 | 130 | 104 |
| ६ | परंडा | 22 | 26 | 6 | 65 | 7 | 76 | 117 | 117 |
| ७ | तुळजापूर | 21 | 24 | 25 | 92 | 20 | 76 | 80 | 83 |
| ८ | वाशी | 7 | 8 | 8 | 72 | 13 | 75 | 163 | 104 |
| **जिल्हा एकूण** | | **170** | **202** | **187** | **1035** | **193** | **1014** | **103** | **98** |




REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA












विशेष मिशन इंद्रधनुष्य २.०
संपूर्ण लसीकरण
श्री महालक्ष्मी







# * दुसरी फेरी दि.०६ जानेवारी २०२० साठी नियोजन :-

## विविध विभागाकडुन अपेक्षित सहकार्य

➤ **एकात्मीक बालविकास विभाग** :- अंगणवाडीच्या मदतीने हेड काउंट सर्व्हे करण्यात यावा व याद्या निश्चीत कराव्यात. अंगणवाडी पर्यवेक्षिका यांनी सनियंत्रण करण्यात यावे. एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी व मुख्यसेवीका यांचे मार्फत पर्यवेक्षण. लसीकरण केंद्रावर जे लाभार्थी आले नाहीत असे लाभार्थी केंद्रावर आणनेसाठी अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनिसांचे सहकार्य व जनजागृति.

➤**ग्राम विकास विभाग :-** ग्रामीण भागात ग्राम पंचायत स्तरावर सर्व लोकांची बैठक आयोजित करण्यात यावी व या बैठकिमध्ये लसीकरणाचे महत्व संमजावून सांगण्यात यावे. ग्राम पंचायत सदस्य व सरपंच व आरोग्य विभाग यांनी एकमेकांच्या मदतीने लसीकरणासाठी नकार देणाऱ्या लाभार्थीच्या कुटूंबाला प्रवृत्त करावे.

➤**नगर विकास विभाग (नागरी विभागाकरीता) :-** झोपडपटटी कार्यक्षेत्राकरीता आवश्यकतेनूसार विशेष कर्मचारी / स्वयंसेवकांची नियुक्ती प्रतिसाद न देणाऱ्या लाभार्थ्यांचे मतपरिवर्तन करण्यासाठी उपाययोजना, आवाहन, प्रमाणपत्र याव्दारे जनजागृति.

➤ **नगर पालीका :-** नगर पालीका कर्मचाऱ्यांचे लसीकरण केंद्रावर सहभाग, नगर पालीका अधिकाऱ्यां मार्फत पर्यवेक्षण, झोपडपटटी कार्यक्षेत्राकरीता आवश्यकतेनूसार विशेष कर्मचारी / स्वयंसेवकांची नियुक्ती प्रतिसाद न देणाऱ्या लाभार्थ्यांचे मतपरिवर्तन करण्यासाठी उपाययोजना, आवाहन, प्रमाणपत्र याव्दारे जनजागृति.

# विविध विभागाकडुन अपेक्षित सहकार्य

➢**शिक्षण विभाग** :- शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सहभागाने प्रभातफेरी, पथनाटय, पदयात्रा याव्दारे जनजागृति. लसीकरण केंद्रावर जे लाभार्थी आले नाहीत असे लाभार्थी केंद्रावर आणण्यासाठी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे सहकार्य. एनसीसी व एनएसएस च्या विद्यार्थ्यांच्या सहभाग. लसीकरणासाठी येणाऱ्या लाभार्थ्यांना सुविधा उपलब्ध करुन देणे. शिक्षक व पालक यांचे व्हाटसअ‍ॅप ग्रूपवर मोहिमेची माहिती देण्यात यावी.

➢**समाज कल्याण विभाग :-** ज्या क्षेत्रात लसीकरणाचे काम अत्यंत कमी आहे व लसीकरणाला नकार देण्याचे प्रमाण जास्त आहे अश ठिकाणी मौलाना यांचे मार्फत जनजागृति करण्यात यावी. स्थानीक भाषेत मोहिमेची प्रसिध्दी करण्यात यावी उद:उर्दु. अल्पसंख्यांक स्थानिक नेत्यामार्फत बैठका आयोजित करुन मोहिमेचे महत्व संमजावून सांगणे.

➢**जिल्हा माहिती अधिकारी :-** पत्रकार परिषद आयोजित करण्यात यावी. मोहिमेचे वृत्तपत्रामध्ये व्यापक प्रसिद्धी करावी.

➢ **राज्य परिवहन महामंडळ :-** एस.टी. बस स्थानकावर अनाउंन्समेंट करणे, एस.टी. बस प्रवासा दरम्यान लाभार्थ्यांना लसीकरण, एस.टी. बस स्थानकावर होर्डींग्ज उभारणे, बॅनर्स लावणे, भिंतीवर संदेश लिहीणे, एस.टी. बस तिकीटाव्दारे मोहिमेस प्रसिध्दी देणे.

➢ **रेल्वे स्टेशन :-** स्टेशनवरील ध्वनीक्षेपकावरुन मोहिमेचा संदेश देण्यात यावा.रेल्वे तिकीटावर संदेश छापण्यात यावा.

➢**विद्यूत विभाग :-** लसींची गूणवत्ता राखणेसाठी शितसाखळी उपकरणे कार्यान्वीत असणे आवश्यक आहे. यासाठी आरोग्य संस्थांमधील विद्युत पुरवठा अखंडीत ठेवणे. आरोग्य संस्थेमध्ये विद्यूत पुरवठा खंडीत झाले बाबतची तक्रार आल्यास तात्काळ निवारण करणे, विज बिल देयक भरणा केंद्रावर विशेष मिशन इंद्रधनुष मोहिमेची प्रसिध्दी करण्यात यावी.

| जिल्हास्तरीय तालुका संपर्क अधिकारी (ग्रामीण) जि.उस्मानाबाद | | | |
|---|---|---|---|
| **विशेष मिशन इंद्रधनुष (IMI) २.० मोहिम** | | | |
| **तालुका** | **अधिकारी नाव** | **पदनाम** | **मोबाईल क्रमांक** |
| **डॉ.एच.व्ही.वडगावे** | | **जिल्हा आरोग्य अधिकारी** | **9405844323** |
| उस्मानाबाद | डॉ.सोपल ए.ए. | जिल्हा क्षयरोग अधिकारी | 9822669714 |
| तुळजापूर | डॉ.रफीक अन्सारी | सहाय्यक संचालक, (कुष्ठरोग) | 8806361987 |
| लोहारा | डॉ.परळीकर जी.आर. | जिल्हा आयुष अधिकारी | 9421387179 |
| उमरगा | डॉ.पांचाळ एम.आर. | जिल्हा हिवताप अधिकारी | 9423340034 |
| वाशी | डॉ.राउत एच.के. | वैद्यकिय अधिकरी जि.प्र.सं. | 9422468593 |
| भुम | डॉ.शिनगारे ए.डी. | जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी | 9404558629 |
| कळंब व परंडा | डॉ.सय्यद जे.एन. / श्री.कवितके डी.डी. | सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी / सांख्यिकी अधिकारी | 8329925477<br>9403685056 |

| विशेष मिशन इंद्रधनुष (IMI) २.० | | | | |
|---|---|---|---|---|
| जिल्हास्तरीय तालुका संपर्क अधिकारी (शहरी) | | | | |
| अ.क्रं. | तालुका | अधिकारी नाव | पदनाम | मोबाईल क्रमांक |
| १ | उस्मानाबाद | Dr. Bhaskar Sabale | Pathologist | 8605624488 |
| २ | तुळजापूर | Dr.Sachin Bodke | RMO (OR) | 9405236480 |
| ३ | उमरगा | Dr.Ashok Dhumal | Pediatrician | 9422610292 |
| ४ | मुरुम | Dr.Amol Kapase | Pathologist | |
| ५ | कळंब | Dr.Sachin Deshmukh | M.S.W.H. | 9422069988 |
| ६ | भुम | Dr.R B Papade | ENT Speacialist | 9881101023 |
| ७ | परंडा | Dr.Satish Adatrao | Anesthesia | |

# IMI 2.0 2nd Round 6 January 2020 Planning Dist-Osmanabad

| Sr.No | Block Name | SESSION PLANNED | Children Vaccination | Pregnant Women Vaccination |
|---|---|---|---|---|
| | | | No. of Target Children for the round | No.of Target Pregnant Women for the round |
| 1 | Bhoom | 27 | 66 | 7 |
| 2 | Kallamb | 15 | 61 | 2 |
| 3 | Lohara | 11 | 17 | 1 |
| 4 | Omerga | 16 | 146 | 19 |
| 5 | Osmanabad | 19 | 107 | 14 |
| 6 | Paranda | 19 | 40 | 8 |
| 7 | Tuljapur | 19 | 52 | 11 |
| 8 | Washi | 7 | 52 | 2 |
| | Total | 133 | 541 | 64 |


विसरू नका
लसीकरण अवश्य करा